# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/८७१२/२०१७ पुणे शहर दिनांक२७ /१०/२०१७

पुणे शहरातील सांगवी वाहतुक विभाग अंतर्गत जगताप डेअरी चौक (साई चौक) येथे औंध रावेत बी आर टी मार्गावर दुहेरी उड्डाण पुलाचे व ग्रेड सेपरेटरचे काम चालु आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, जगताप डेअरी चौक (साई चौक) येथे होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व वाहतुक सुरळित, सुरक्षित चालू राहण्यासाठी तसेच प्राणांतिक व गंभीर अपघात टाळण्यासाठी सदर ठिकाणी खालील प्रमाणे तात्पुरते आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**सकाळी ०७.०० ते ११.३० वाजेपर्यंत व १६.०० ते २१.३० वाजेपर्यंत काळेवाडी फाटा ते जगताप डेअरी चौक व कस्पटे चौक ते जगताप डेअरी चौक दरम्यानच्या रस्त्यावरुन फक्त जगताप डेअरी चौकात येण्यासाठी लक्झरी बसेस, ट्रॅव्हल्स तसेच, ट्रक आणि इतर सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना (शासकिय बसेस,ॲम्बुलन्स व फायरब्रिगेडची वाहने व्यतिरिक्त) जगताप डेअरी उड्डाण पुल व ग्रेड सेपरेटचे काम पुर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश बंद करण्यात येत आहे.**